सहकारातून समृध्दीकडे 	सत्यमेव जयते 	2025 आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष


**महाराष्ट्र शासन**

**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,**

**जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी, रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.रत्नागिरी तथा विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, कोकण विभाग,नवी मुंबई यांचे कार्यालय**

कोकण भवन, ३ रा मजला, कक्ष क्रमांक ३०८, नवी मुंबई ४०० ६१४

दुरध्वनी क्र. २७५७१३९५/९६ 	Email Id :djrkkn@gmail.com


## रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. रत्नागिरी व्यवस्थापक समिती पंचवार्षिक निवडणूक सन २०२६ ते २०३१

## प्रारुप मतदार यादी अंतिम करण्याचा कार्यक्रम

**(महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणुक) नियम २०१४ चे नियम ११(१) ते (४) नुसार)**

## :- जाहीर सूचना -:

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब अन्वये रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. रत्नागिरी या बँकेची सन २०२६ ते २०३१ या कालावधीच्या संचालक मंडळ सदस्यांच्या निवडणुकीचे संदर्भात मा.राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, कोकण विभाग, नवी मुंबई यांची जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी म्हणून नियुक्ती केलेली आहे. रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. रत्नागिरी बँकेच्या सन २०२६ ते २०३१ या कालावधीच्या पंचवार्षक निवडणूकीसाठी प्रारुप मतदार यादी तयार करणेसाठी पात्र सभासद संस्थांचे ठराव प्राप्त झाले आहेत.

त्या अनुषंगाने रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. रत्नागिरी या बँकेची प्रारुप मतदार यादी अंतिम करण्याचा निवडणूक कार्यक्रम खालीलप्रमाणे राहील.

| **रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. रत्नागिरी बँकेच्या प्रारुप मतदार यादी अंतिम करण्याचा कार्यक्रम** | | |
|---|---|---|
| १. | प्रारुप मतदार यादी जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांनी प्रसिध्द करण्याचा दिनांक | **दि.०१/१०/२०२६ सकाळी ११:०० वा.**<br>**ठिकाण** :- १. मा. जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी.<br>२. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, कोकण विभाग, नवी मुंबई, कक्ष क्र.३०८, ३ रा मजला, कोकण भवन, बेलापूर, नवी मुंबई यांचे कार्यालय.<br>३. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, रत्नागिरी यांचे कार्यालय.<br>४. रत्नागिरी जिल्हयातील सर्व तहसिलदार यांची कार्यालये.<br>५. रत्नागिरी जिल्हयातील सर्व सहाय्यक निबंधक / सहकारी अधिकारी श्रेणी -१ यांची कार्यालये.<br>६. रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. रत्नागिरी यांचे मुख्यालय व बँकेच्या सर्व तालुका शाखा.<br>७. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या Scea.maharashtra.gov.in व रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. रत्नागिरी यांच्या https://ratnagiridccb.bank.in/ या वेबसाईटवर |

| | | |
|---|---|---|
| २. | जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांचेकडे प्रारुप मतदार यादीवर आक्षेप सादर करण्याचा दिनांक | **दिनांक ०१/१०/२०२६ ते दिनांक १३/१०/२०२६**<br>**ठिकाण :-** विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, कोकण विभाग, नवी मुंबई, कक्ष क्र.३०८, ३ रा मजला, कोकण भवन, बेलापूर, नवी मुंबई यांचे कार्यालयत समक्ष अथवा टपालाने आक्षेप सादर करता येतील तसेच djrkkn@gmail.com या ई-मेल वर देखील पाठविता येतील. |
| ३. | जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांनी प्राप्त आक्षेपांवर निर्णय देण्याचा अंतिम दिनांक | दिनांक २२/१०/२०२६ |
| ४. | जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांनी अंतिम मतदार यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | **दिनांक २६/१०/२०२६ रोजी सकाळी ११:०० वा.**<br>**ठिकाण :-** १. जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी.<br>२. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, कोकण विभाग, नवी मुंबई, कक्ष क्र.३०८, ३ रा मजला, कोकण भवन, बेलापूर, नवी मुंबई यांचे कार्यालय.<br>३. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, रत्नागिरी यांचे कार्यालय.<br>४. रत्नागिरी जिल्हयातील सर्व तहसिलदार यांची कार्यालये.<br>५. रत्नागिरी जिल्हयातील सर्व सहाय्यक निबंधक / सहकारी अधिकारी श्रेणी -१ यांची कार्यालये.<br>६. रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. रत्नागिरी यांचे मुख्यालय व बँकेच्या सर्व तालुका शाखा.<br>७. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या Scea.maharashtra.gov.in व रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. रत्नागिरी यांच्या https://ratnagiridccb.bank.in/ या वेबसाईटवर |

प्रारुप मतदार यादीतील आक्षेप दिनांक ०१/१०/२०२६ ते दिनांक १३/१०/२०२६ रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेत स्वीकारले जातील. त्यानंतर प्राप्त होणा-या आक्षेपाचा विचार केला जाणार नाही, याची कृपया सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी. आक्षेपकर्त्यांनी आपला ई-मेल आयडी व व्हॉट्सअॅप नंबर आक्षेप अर्जामध्ये नमूद करावा. आक्षेपावरील सुनावणीची नोटीस स्पीड पोष्टाने तसेच आक्षेप अर्जात नमूद केलेल्या ई-मेल आयडीवर व व्हॉट्सअॅप नंबर वरही पाठविण्यात येईल. जर एखादया आक्षेपकारास/तक्रारदारास/ संबंधितास पोष्टाने पाठविलेल्या आक्षेपावरील सुनावणीची नोटीस मुदतीत मिळाली नाही तर आपण आक्षेप अर्जामध्ये नमूद केलेल्या ई-मेलवर व व्हॉट्सअॅपवर पाठविलेली नोटीस अधिकृत समजावी व सुनावणीस दिलेल्या दिनांकास व वेळेस उपस्थित राहण्याची दक्षता घ्यावी.

दिनांक :- ०१/१०/२०२६.

Digitally signed by
Adinath Lahanu Dagade
Date: 28-09-2026
15:17:58

**(आदिनाथ दगडे)**
**जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी,**
**रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती बँक लि.रत्नागिरी**
**तथा विभागीय सहनिबंधक,**
**सहकारी संस्था, कोकण विभाग, नवी मुंबई**